# सुशासन

## (तत्वे आणि पद्धती)




संपादक

डॉ. नितीन गौरखेडे

डॉ. मुक्ता सोमवंशी

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# सुशासन

(सिद्धांत आणि पद्धती )

■ डॉ. नितीन गौरखेडे
डॉ.मुक्ता सोमवंशी

■ प्रथम आवृत्ती – २५ , डिसेंबर २१)

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-63-5

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख / लेखक | पु.क्र. |
|---|---|---|
| 1 | सुशासनाच्या भुमिकेत झालेला बदल — प्रा.डॉ.एम.एफ.राऊतराहे | 1 |
| 2 | सुशासन आणि महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम — प्रा. सुरेशलक्ष्मण शहापुरे | 8 |
| 3 | राज्य का आधार सुशासन की अवधारणा एक अध्ययन — डॉ.टी.एल.मिर्झा | 12 |
| 4 | सुशासन : उगम आणि विकास — प्रा.डॉ. नितीन दादाराव गौरखेडे | 25 |
| 5 | सुशासन की लोकतांत्रिक संकल्पना — डॉ. मनीष कुमार साव | 28 |
| 6 | सुशासनः समस्या एवं उपाय — प्रा.डॉ.कोनेरू बाबन्ना डुमलवाड | 34 |
| 7 | सुशासनातील अडथळे — प्रा डॉ.आंधळे बी.व्ही. | 40 |
| 8 | सुप्रशासन समस्या व उपाय — सौ.प्राची चैतन्य पाटील | 47 |
| 9 | लोकसेवेचा हक्क : सुशासन, सर्वसमावेशक विकास आणि मानवी हक्क — डॉ. संदीप भि. काळे | 53 |
| 10 | सुशासन से प्रशासनिक दर्शन — डॉ कुलकर्णी वनिता बाबुराव | 61 |
| 11 | सुशासनासाठी विरोधी पक्षाची अवश्यकता — प्रा. डॉ. विजयकुमार सोन्नर | 67 |
| 12 | सुशासन संकल्पना आणि महत्व — देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 77 |
| 13 | माहितीचा अधिकार आणि सुशासन — प्रा.डॉ.वसंत पांडुरंग सरवदे | 82 |
| 14 | सुशासन[illegible] निर्मितीत ई-प्रशासनाची भूमिका — सहा.प्रा. ठाकरे डी. डी. | 91 |
| 15 | लोकशाही – निवडणूक आणि सुशासन : एक चिकित्सक अध्ययन — डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 100 |
| 16 | सुशासन : संकल्पना, निर्धारक तत्व आणि आव्हानांचे विश्लेषण — प्रा.डॉ.लक्षटे आर.बी / प्रा.डॉ.लक्षटे बी.बी. | 108 |
| 17 | सुशासन आणि राजकीय पर्यावरण — डॉ.जीवन एच.पवार / रुपसिंग दशरथ राठोड | 114 |
| 18 | सुशासन : संकल्पना आणि महत्व — प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे | 123 |
| 19 | सुशासन संकल्पना आणि महत्व — कठरे धानाजी नारायण | 132 |
| 20 | सु-शासन निर्मितीत जनतेचा सहभाग — डॉ. सोमवंशी मुक्ता गोविंदराव | 138 |
| 21 | लोकशाही,सुशासन आणि त्याच्या यशस्वीतेची आधारभूत तत्वे — प्रा. डॉ.पदमाकर प्रेमदास दारोंडे | 146 |
| 22 | भारतातील सुशासन : एक अध्ययन — डॉ. माया वाटाणे | 153 |


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# सु-शासन निर्मितीत जनतेचा सहभाग

डॉ. सोमवंशी मुक्ता गोविंदराव
सहयोगी प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी
९१४५४५१३१४,muktags76@gmail.com

अलीकडच्या काळात सु-शासन ही संकल्पना विविधांगांनी अभ्यासली जात आहे.लोकप्रशासन व राज्यशास्त्र या विषयांमध्ये ही संकल्पना राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कारण अलिकडच्या काळात जगात सर्वत्र शासनाकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्याचबरोबर शासनानेही कल्याणकारी राज्याचा स्वीकार केला आहे. तेव्हा प्रत्येक सरकारला लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करावयाची असेल तर प्रथम सु-शासन निर्माण करणे अत्यावश्यक आहे. सु-शासन ही संकल्पना आज सर्वत्र चर्चेत असली तरी ही संकल्पना फार प्राचीन काळापासूनच अस्तित्वात असल्याचे दिसून येते. जसे भारतीय विचारवंत कौटिल्य यांच्या 'अर्थशास्त्र'या ग्रंथ◌ात सु-शासन निर्माण करण्याच्या दृष्टीने तत्त्वज्ञान सांगण्यात आले आहे. तसेच ग्रीक विचारवंत प्लेटो यांच्या 'रिपब्लिक' ग्रंथातील 'तत्त्वज्ञानी राजा' ही संकल्पना सु-शासन निर्मितीस पोषक आहे. कौटिल्य आणि प्लेटो यांनी राज्य व राजा यांच्या विषयी जे विचार मांडले आहेत, ते विचार सु-शासनाकडे घेऊन जाणारे होते.





Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

संशोधन पद्धती

तथ्य संकलन:- प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी आवश्यक असलेल्या माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, मासिक, वृत्तपत्र व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आह◌े.

शोध निबंधाचे उद्देश

१) सु-शासनाची संकल्पना समजून घेणे.

२) सु-शासनाची पार्श्वभूमी स्पष्ट करणे.

३)सु-शासन व जनता यांचा सहसंबंध स्पष्ट करणे.

४) शासन व प्रशासनाची सुशासन◌ातील भूमिका स्पष्ट करणे.

गृहीत कृत्य:-१) सु-शासन निर्मितीसाठी जनता जागृत असणे महत्त्वाचे आहे.

२) सु-शासन निर्मितीत राज्यकर्ते व प्रशासकांची नीतिमत्ता प्रभावी ठरते.

सु-शासनाचा अर्थ व व्याख्या

प्लेटो यांनी सांगितलेला 'तत्त्वज्ञ राजा' ही संकल्पना आदर्श राज्य निर्मितीसाठी आवश्यक मानली. म्हणजेच राजा कसा असावा? या प्रश्नाचे स्पष्टीकरण देत असताना जे तत्त्वज्ञान प्लेटो यांनी सांगितले आहे. त्यानुसार राजाने आपली कार्ये पार पाडली असता जी व्यवस्था निर्माण होणार आहे, ते आदर्श राज्य असेल.म्हणजेच सु-शासन प्रस्थापित होते. तसेच कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात राजाच्या कार्याचा व एकंदरीत राजाने काय करावे व काय करू नये. या विषयीचे जे विवेचन केले आहे. त्यातून एक आदर्श राजा निर्माण होतो. हा राजा जनतेच्या हितातच राजाचे हित पाहतो. 'यथा राजा तथा प्रजा' याप्रमाणे प्रजेची उन्नति किंवा अवनती राजावरच अवलंबून असते. त्यामुळे राजा हा सर्वगुणसंपन्न असला पाहिजे, असे मत मांडून सु-शासन निर्माण करण्यासाठी राजाने सतत प्रयत्नशील असावे, असे प्रतिपादन केले आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta Sonpeth Dist. Parbhani



अलिकडच्या काळात जागतिक बँकेने सुशासन ही संकल्पना प्रथम अधोरेखित केली व नंतर जागतिक बँक अहवाल १९९२ मध्ये सु-शासनाच्या [illegible] संकल्पनेचे प्रतिपादन केले'१ या अहवालानुसार सुशासन म्हणजे परिणामकारक लोकसेवा, विश्वासार्ह न्याय व्यवस्था आणि लोकांप्रती उत्तरदायी असणारे प्रशासन होय'२

प्लेटो यांच्या मते,"शासनाची सूत्रे ही विवेकी, विशेषज्ञ, नीतिमान, व्यवहारी, मुत्सद्दी आणि प्रशिक्षित शासकांच्या हाती असतील तर राज्यात सुशासन व न्यायाची स्थापना होईल" तर महात्मा गांधी यांनी सुशासनासाठी 'रामराज्य' ही कल्पना सांगितली आहे.

कोनेबल यांच्या मते, "ही एक अशी लोकसेवा आहे की जी दक्ष आहे, एक असे जनतेप्रती तंत्र आहे जे विश्वसनीय आहे,एकअसेप्रशासन आहे जे जनतेप्रती उत्तरदायी आहे". तर युनेस्कोने सु-शासनांतर्गत उत्तरदायित्व, पारदर्शकता, समता, लोकशाही यांचा समावेश केलेला आहे.

उपरोक्त विचारवंतांच्या मता नुसार सु-शासन म्हणजे जबाबदार, उत्तरदायी, पारदर्शी व लोककल्याणकारी शासन होय.

प्रस्तुत शोधनिबंधात सु-शासन निर्मितीत जनतेचा सहभाग हा मुख्य भाग असल्यामुळे या दृष्टीने विवेचन होणे आवश्यक आहे. तेव्हा सु-शासन निर्मितीत जनतेची भूमिका फार महत्त्वाची ठरते. कारण राज्याच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या चार घटकांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून जनतेकडे पाहिल्या जाते. भूभाग, सार्वभौमत्व, सरकार या तिन्ही घटकांना तेव्हाच अर्थ प्राप्त होतो. जेंव्हा यामध्ये जनता असते. जनता हाी खऱ्या अर्थाने राज्याचा आत्मा आहे. किंबहुना राज्य ही संकल्पना जनहितासाठी जनतेनेच निर्माण केली आहे. त्याच प्रमाणे सुशासन निर्मितीत जनता हा घटक फार महत्त्वाचा ठरतो.



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Parbhani



सुशासन निर्मितीसाठी जनता कशी असावी? हा प्रश्न उपस्थित केला असता जनतेच्या अंगी काही विशेष गुण असणे आवश्यक आहे. त्यामुळे जनता सु-शासन निर्मितीसाठी हातभार लावू शकेल आणि सुशासन संकल्पना वास्तवात येऊन संपूर्ण लोकांना एक उत्तम जीवन मान प्राप्त होईल.

१) चारित्र्यसंपन्नता:- देशातील जनता चारित्र्यसंपन्न असेल तर त्या देशांमध्ये सुशासन निर्मितीस पोषक वातावरण तयार होते. चारित्र्यसंपन्नता हा गुण फार व्यापक स्वरूपाचा असून, यामध्ये मानवाच्या एकंदरीत वर्तणुकीचा विचार केला जातो. तसेच शासनामध्ये व प्रशासनामध्ये कार्य करणाऱ्या व्यक्ती सुद्धा प्रथम जनताच असतात. तेव्हा देशातील जनता चारित्र्यसंपन्न असेल तर शासन व प्रशासनातील व्यक्ती ही चारित्र्यसंपन्न असतील आणि अशा व्यक्ती आपले कार्य नीतिमत्ता पूर्वक पार पाडतील. परिणामी शासनाच्या ध्येयधोरणांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी झाल्यामुळे सुशासन निर्माण होते. तसेच ज्या व्यक्ती नागरिकांच्या भूमिकेमध्ये आहेत त्यांनी पण कायद्यानुसार वर्तन करणे अपेक्षित असते. कायद्याचा अर्थ लावणे आवश्यक असते. परंतु अनेक वेळा व्यक्ती कायद्याचा अर्थ समजून घेत असताना आपल्या सोयीनुसार घेतात. यामुळे प्रशासन यंत्रणेत पेच निर्माण होतो. परिणामी सुशासनाला धोका उत्पन्न होतो. म्हणून देशातील जनता सर्वगुणसंपन्न असेल तर सुशासन निर्माण होण्यास फार मोठ्या प्रमाणात मदत होते.

२) कर्तव्यदक्षता:- राज्याचा नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तीची त्याच्याप्रती काही कर्तव्य असतात. या कर्तव्याचे प्रत्येक व्यक्तीने पालन केले असता सुशासन प्रस्थापित होण्यास अधिक मदत मिळते. उदा. मतदान करणे हा आपला अधिकार आहे त्याचबरोबर कर्तव्य देखील आहे. या अधिकाराचा वापर करून आपले कर्तव्य पार पाडीत असताना निवडणूकीत उभे असलेल्या उमेदवारांचा अभ्यास करून योग्य उमेदवार निवडून देणे हे मतदार म्हणून प्रत्येकाचे कर्तव्य असते. प्रत्येक

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



[illegible]दाराने आपले हे कर्तव्य कोणत्याही आमिषाला बळी न पडता सद्सद्विवेक बुद्धीने पार पाडले असता योग्य व्यक्तीला निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळेल. शासनामध्ये पात्र, निस्वार्थी, निष्ठावान व्यक्ती गेली असता, योग्य पद्धतीने कार्य करून जनहित साधले जाईल. परिणामी सुशासन प्रस्थापित होईल.

३) अधिकाराची जाणीव:- काही व्यक्ती अशा असतात की त्यांना आपल्या अधिकाराची जाणीव नसते. जर व्यक्तीला आपल्या अधिकाराविषयी माहिती नसेल, तर त्या व्यक्तीला आपल्या जीवनाचा अर्थ समजत नाही. अशा व्यक्ती राष्ट्रहिताच्या दृष्टीने घातक ठरतात. म्हणून देशातील जनता ही जागृत असणे आवश्यक आहे. जेव्हा आपल्या देशात काही घटना घडते तेव्हा त्या घटनेचा अभ्यास करणे आवश्यक असते. अन्यथा व्यक्तीच्या अज्ञानामुळे त्याच्या अधिकाराचे हनन होते. यामुळे सुशासन◌ात बाधा निर्माण होते. तेव्हा ज्या देशातील जनता आपल्या हक्कांविषयी जागृत असते ती शासनकर्त्यावर योग्य पद्धतीने नियंत्रण ठेवू शकते.

'समाजातील स्त्री पुरुषांचा प्रत्यक्ष किंवा विविध संघटनांच्या माध्यमातून प्रशासनातील सहभाग वाढविणे गरजेचे असते. प्रशासनात लोकांचा सहभाग संघटित आणि माहितीपूर्ण असल्यास उत्तम प्रशासन निर्माण करण्यास मदत होते. सुशासनामध्ये जनसहभागाला विशेष महत्त्व आहे. कारण सहभागाशिवाय सशक्तीकरण व स्वविकासाचे ध्येय पूर्ण होऊ शकत नाही"३

सुशासनात नागरिकांनी आपल्या संवैधानिक उत्तरदायित्वाच्या निर्वाहासाठी प्रशासनाशी सहकार्य करणे आवश्यक असते. नैतिक स्वरूपाने ते सहभागी झाले पाहिजेत. स्वयंप्रेरित, स्वनिर्देशित व स्वप्रशासित प्रशासनाचे लक्ष प्राप्त करण्यासाठी हा सहभाग असणे गरजेचे आहे आणि असा सहभाग लोकशाही शासन व्यवस्थेत शक्य आहे. अशा सहभागामुळे सामाजिक भांडवल, सामाजिक उद्योगशीलता, सहकार्यात्मक शक्ती व सामूहिक सृजनात्मक निर्मिती होते'४जसे



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



पोलीस मित्र ही संकल्पना निर्माण करून लोकांना पोलिसांना सहकार्य करण्यास प्रेरित केल्यामुळे काही अंशी गुन्हेगारीला आळा घालण्यास मदत होते आहे.

शासन आणि प्रशासन या दोन्ही घटक◌ा◌ंची सुशासन निर्मितीत फार महत्त्वाची भूमिका आहे. किंबहुना शासन आणि प्रशासनात कार्यरत व्यक्तीच◌ी निर्णयक्षमता, उत्तरदायित्वाची भावना, संवेदनशीलता, नीतिमत्ता, निष्ठा हे गुणसु-शासनाच्या निर्मितीत महत्त्वाचे ठरतात. सर्वगुणसंपन्न उदार मनाचे शासन करते व प्रतिभावान व जबाबदार व संवेदनशील प्रशासकीय अधिकारी हे प्रशासनाला विकट परिस्थितीतून बाहेर काढून एक उत्तम व्यवस्था निर्माण करू शकतात कारण शासनातील व्यक्ती निर्णय घेतात तर प्रशासनातील अधिकारी त्या निर्णयाची अंमलबजावणी करीत असतात तेव्हा योग्य निर्णय व त्याची उत्तम अंमलबजावणी झाली असता समाजाला सुशासनाचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही म्हणून शासन करते व सनदी सेवक यांची भूमिका सु शासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते तसेच जनतेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सुद्धा राज्यकर्ते व सनदी सेवक यांची भूमिका विशेष महत्त्वाची असते.

गृहीत कृत्याची पडताळणी-: प्रस्तुत शोधनिबंध साठी पहिले गृहीतकृत्य सुशासन निर्मितीसाठी जनता जागृत असणे महत्त्वाचे असते हे निश्चित करण्यात आले होते ते सत्य असल्याचे शुद्ध होते कारण जोपर्यंत जनता आपल्या हक्क तसेच कर्तव्य प्रति जागरूक होत नाही तोपर्यंत ती शासनाच्या कार्याचे मूल्यमापन करू शकत नाही मूल्यमापनात शिवाय प्रशासनातील दोष आढळून येऊ शकणार नाहीत व दोष दूर केल्याशिवाय सुशासन निर्माण होऊ शकत नाही म्हणून हे गृहीत कृत्य सत्य असल्याचे सिद्ध होते दुसरे गृहीतकृत्य सुशासन निर्मितीत राज्यकर्ते व प्रशासन यांची नीतिमत्ता प्रभावी ठरते हे निश्चित करण्यात आले होते उपरोक्त विवेचनावरून हे गृहीत कृत्य सत्य असल्याचे सिद्ध होते

उपाय योजना प्रशासनातील जनतेचा सहभाग वाढविणे हे सर्व दृष्टीने गरजेचे आहे शासन व प्रशासन कार्यातील जनसहभाग वाढविण्यासाठी खालील उपाययोजना करता येतील

१) सम सर्वप्रथम संपूर्ण जनतेला त्यांच्या हक्का हक्क तसेच त्यांची त्याचे महत्त्वही पटवून देणे आवश्यक आहे.

२) सर्वसामान्य लोकांना कायदा प्रशिक्षण देणे आवश्यक आहे राज्य घटना म्हणजे काय व त्यातील सर्व कलमं विषयी जनतेमध्ये जागृती होणे गरजेचे आहे.

३) कायद्याचे शासन ही बाब राबवत असताना कायद्याचा योग्य अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे तसेच कायद्याची भाषा सर्वांना समजेल अशी साधी सोपी असावी.

४) भ्रष्टाचार करणाऱ्यांना बरोबरच भ्रष्टाचारास प्रोत्साहन देणार यांनाही दंड होणे आवश्यक आहे.

५) नागरिकांची सनद प्रत्येक कार्यालयाच्या मुख्य द्वारावर लावून त्याविषयीची माहिती जनतेला देणे.

६) नागरिकांच्या राष्ट्रीय व सामाजिक भावनांचा विकास करणे.

७) प्रशासन कार्यातील जनतेचा सहभाग० विषयी जनजागृती करणे.

निष्कर्ष:-इतिहासात डोकावले असता सुशासन ही संकल्पना आजची नसून प्राचीन काळापासूनच सुशासन चांगले शासन असावे यावर भर देण्यात आल्याचे दिसून येते परंतु अलीकडच्या काळात सुशासन या संकल्पनेविषयी व त्याच्या प्रस्थापन विषयी जागतिक स्तरावरून प्रयत्न केले जात आहेत सर्व जनतेला उत्तम जीवन जगण्याच्या दृष्टीने सुशासन निर्माण होणे आवश्यक आहे त्याचबरोबर सुशासनाचा प्रस्थापनेसाठी जनता जागृत व कर्तव्यदक्ष असणेही गरजेचे आहे सुशासन आस निर्मितीसाठी केवळ शासन व प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे असे नाही तर जनतेची भूमिकाही तेवढीच महत्त्वाची आहे तसेच कल्याणकारी राज्याची संकल्पना पूर्णत्वास नेण्यासाठी सुशासनाची प्रस्थापना होणे गरजेचे आहे.





संदर्भसूची


१) डॉ.सुवर्णा मुंडगे- बेनके -लोकप्रशासन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव , प्रथम आवृत्ती जून २०१५ पृष्ठ क्रमांक ७९

२) उपरोक्त पृष्ठ क्रमांक ७९

३) उपरोक्त पृष्ठ क्रमांक ८२

४) उपरोक्तपृष्ठ क्रमांक ८३


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani